# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.11.2025** **वार:गुरुवार**

1. विकसित भारतासाठी भविष्यातील कृषी प्रणाली तयार करण्याकरिता एकत्रित प्रयत्न करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
2. गोव्यात आजपासून चित्रपटांचा उत्सव
3. यंदाचा गदिमा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर आणि,
4. मूकबधीरांच्या ऑलिंपिकमध्ये अभिनव देशवाल आणि प्रांजली धुमाळ या जोडीला सुवर्णपदक

**पंतप्रधान**

विकसित भारतासाठी भविष्यातील कृषी प्रणाली तयार करण्याकरिता एकत्रित प्रयत्न करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल कोईमतूर इथं केलं. दक्षिण भारत नैसर्गिक कृषी शिखर परिषदेचं उद्घाटन करताना पंतप्रधान बोलत होते. पंतप्रधानांनी शेतकऱ्यांना एका हंगामात एक एकर भूभागावर नैसर्गिक शेती करण्याचं आणि त्याचे अद्भुत परिणाम पाहण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले.....

**भारत नेचुरल फार्मिंग का ग्लोबल हब बनने के रास्ते पर है। हमारी बायोडायवर्सिटी एक नया आकर ले रही है। देश के युवा भी अब एग्रीकल्चर को एक मॉडर्न के लेवल अपॉर्चुनिटी के रूप में देख रहे हैं इससे देश की रूरल इकोनॉमिक को बहुत बड़ी ताकत मिलने जा रही है।**

मोदी यांनी पीएम-किसान योजनेचा 21 वा हप्ता यावेळी वितरित केला. देशभरातल्या नऊ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 18 हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा करण्यात आली. महाराष्ट्रातल्या 90 हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या 21 व्या हप्त्याचे एक हजार 808 कोटी 25 लाख रुपये जमा झाले आहेत.

**पीएम किसान-राज्यपाल**

विषमुक्त शेती करणं हेच लक्ष्य असून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून प्रेरणा घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावं, असं आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल पुण्यात केलं. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी वितरण कार्यक्रमात राज्यपाल कृषी महाविद्यालयातून उपस्थित होते. राज्यपाल देवव्रत यांनी शेतीविषयी आपले अनुभव सांगितले आणि पिकांचं संरक्षण आणि उत्पादन वाढविण्यासाठी नैसर्गिक शेती पद्धतीविषयी माहिती दिली.

**व्यापारमेळा-गोयल**

नवी दिल्लीत प्रगती मैदानावर सुरू असलेल्या 44 व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी काल महाराष्ट्र दालनाला भेट दिली. राज्याच्या सर्वसमावेशक आणि सतत प्रगती करणाऱ्या विकास प्रारूपाचं कौतुक करत 'विकसित भारत @2047' च्या राष्ट्रीय संकल्पात महाराष्ट्राचं योगदान अत्यंत महत्त्वाचं आणि प्रेरणादायी आहे, असं गोयल यावेळी म्हणाले.

**ऊस-पाटील**

ऊसाच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करून ती किलोला 41 रुपये करावी, अशी विनंती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांना पत्राद्वारे केली आहे.

त्याचबरोबर एथेनॉलच्या खरेदी दरातही वाढ करावी आणि अतिरिक्त साखरेचा कोटा एथेनॉल उत्पादनाकडे वळवण्यात यावा, असंही पाटील यांनी म्हटलं आहे. या अतिरिक्त एथेनॉल उत्पादनातून सुमारे दोन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळेल आणि तो साखर कारखान्यांना शेतकऱ्यांना उसाचे पैसे वेळेत देण्यास उपयोगी पडेल, असं पाटील यांनी पत्रात म्हटलं आहे.

## जिवाणू विरोधी प्रतिकार

अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स म्हणजे रोगकारक जिवाणूंवर औषधांचा परिणाम न होणं. भारतासहित जगासाठीही असलेल्या या मोठ्या समस्येवरील राष्ट्रीय कृती कार्यक्रमाची द्वितीय आवृत्ती मंगळवारी केंद्र सरकारद्वारे सुरु करण्यात आली. ही समस्या दूर करण्यासाठी, प्रतिजैविकांचा अति प्रमाणात तसंच गैरवापर याबाबत सर्वसामान्य लोकांमध्ये जागरुकता असणं अत्यंत आवश्यक बनलं आहे. या अनुषंगानं राज्याचे माजी शहरी आरोग्यसेवा संचालक डॉक्टर स्वप्निल लाळे यांनी आकाशवाणीशी बोलताना ही माहिती दिली...

**शरीरातील जिवाणू या औषधांना प्रतिकार करायला शिकतात आणि मग ती औषधे या विषाणूंवर काही प्रभाव करत नाहीत आणि हा जीवाणू औषधाला हरवायला लागतो. यालाच अँटी मायक्रोबायोल रेझिस्टन्स किंवा एएमआर असे म्हणतात. उद्या एखादं मोठं ऑपरेशन करायचे आणि ज्यांनी संसर्ग थांबवला पाहिजे अशी औषधं कामच करत नाहीत. रुग्णालयात संसर्ग झाला आणि औषधांनी त्यावर परिणामच होत नाही. लहान मुलांना वृद्धांना, निमोनिया किंवा टायफॉईड झाला आणि औषधं निष्प्रभ झाली ही फक्त कल्पना नाही आज जगातील अनेक देशांमध्ये ही वास्तविकता बनत आहे आणि भारतही त्याला अपवाद नाही. प्रतिजैविके पुरेशा डोसमध्ये आणि पुरेशा कालावधीसाठी घेतली गेली पाहिजेत. लहान मुले वृद्ध यांना सगळ्यात जास्त धोका आहे. शेतात आणि जनावरांना जास्त प्रतिजैविके दिली की जीवाणू त्यांना दाद देत नाहीत. भविष्यात ऑपरेशन आयसीयू प्रसूती हे सर्व धोक्यात येईल. आपण काय करू शकतो? अँटिबायोटिक विनाकारण डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नका. औषधांचा कोर्स अर्धवट सोडू नका. उरलेल्या गोळ्या पुन्हा वापरू नका. जनावरांना औषधे मनाने देऊ नका. स्वच्छता पाळा. हात धुणे, स्वच्छ पाणी हेच खरे संरक्षण होय. अँटिबायोटिक चा सुयोग्य वापर करून भविष्यातील पिढीला सुरक्षित ठेवूया.**

## निवडणूक-छाननी

राज्यात नगरपालिका, नगरपंचायतींच्या आगामी निवडणुकीत दाखल अर्जांच्या छाननीनंतर वैध अर्जांची यादी काल प्रकाशित करण्यात आली. **पुणे** जिल्ह्यातल्या 14 नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांच्या छाननीत अध्यक्षपदासाठीचे 26 तर सदस्य पदासाठीचे 404 अर्ज बाद ठरविण्यात आले. त्यामुळे अध्यक्षपदासाठी 141तर सदस्य पदासाठी एक हजार 945 अर्ज वैध ठरले आहेत. **जळगाव** जिल्ह्यात नगरसेवकपदाचे दोन हजार 487 तर नगराध्यक्षपदाचे 174 अर्ज वैध ठरले आहेत. **रायगड** जिल्ह्यातल्या नगराध्यक्षपदाचे 174 तर नगरसेवकपदाचे दोन हजार 487 अर्ज वैध ठरले आहेत. **नंदुरबार** जिल्ह्यातल्या नगराध्यक्ष पदांसाठी 43 उमेदवारी अर्ज वैध झाले आहेत. तर नगरसेवक पदासाठी 580 अर्ज वैध ठरवण्यात आले. अर्ज मागं घेण्याची मुदत उद्यापर्यंत आहे.

## इफ्फी

छप्पनावा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, इफ्फी-2025 आजपासून गोव्यात पणजी इथं सुरु होत आहे. यामध्ये भारत आणि जगभरातील 270 पेक्षा जास्त चित्रपट प्रदर्शित करण्यात येतील. एक वृत्तांत...

**या महोत्सवाच्या दरम्यान 13 विश्व प्रीमियर आणि आणि 46 एशिया प्रीमियर होतील. सर्वश्रेष्ठ चित्रपटासाठी सुवर्ण मयुर पुरस्कारासह 40 लाख रुपयांची रोख बक्षीसं दिली जातील. यावर्षी जपान केंद्रस्थानी आहे तर स्पेन भागीदार राष्ट्र म्हणून सहभागी होत आहे. ऑस्ट्रेलिया स्पॉट लाईट देश म्हणून आमंत्रित आहे. यावेळी प्रथमच एआय फिल्म हॅकेथॉन आयोजित केली जात आहे. चित्रपट निर्मितीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवकल्पनांचा शोध आणि चित्रपटाचा प्रभाव वाढविण्यासाठी एआयचा एक साधन म्हणून वापर करण्याकरिता ही स्पर्धा आहे. 80 पेक्षा जास्त देशातील पाहुणे,**

**चित्रपट निर्माते, आणि 270 हून जास्त चित्रपटांचा सहभाग यामुळं नऊ दिवस चालणाऱ्या या महोत्सवाच्या आयोजनाला खऱ्या अर्थानं आंतरराष्ट्रीय रुप मिळणार आहे.**

**गदिमा पुरस्कार**

ग.दि. माडगूळकर यांच्या स्मरणार्थ गदिमा प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा गदिमा पुरस्कार यंदा ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती गदिमा प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त आनंद माडगूळकर यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येईल. यंदाचा गृहिणी सखी सचिव पुरस्कार वंदना गांगुर्डे; चैत्रबन पुरस्कार लेखक, दिग्दर्शक नागराज मंजुळे; तर विद्या-प्रज्ञा पुरस्कार गायिका मुग्धा वैशंपायन यांना देण्यात येणार आहे. आनंद माडगूळकर लिखित 'माझ्या खिडकीतून गदिमा' या ग्रंथाचं प्रकाशनही यावेळी करण्यात येणार आहे.

**कुंभमेळा-चिपको-नाशिक**

नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवन परिसरातली एक हजारहून अधिक झाडे तोडण्यात येणार असून या विरुद्ध नाशिककरांनी काल 'चिपको' आंदोलन केलं. महापालिकेला झाडतोडीविरोधात चारशे हरकती प्राप्त झाल्या असून, त्यावर उद्या सुनावणीघेण्यात येणार आहे. दरम्यान, सर्वेक्षण करून गरजेनुसारच झाडे तोडण्यात येतील तसंच त्यासाठीशासन नियमाचं पालन करून एका झाडाच्या बदल्यात सात झाडं लावण्यात येतील, अशी माहिती महापालिकेच्या अतिरीक्त आयुक्त करीष्मा नायर यांनी दिली.

**कार्यशाळा-कोल्हापूर**

कोल्हापूर सायबर महाविद्यालयात 'तृतीयपंथी व्यक्ती कायदेशीर हक्क आणि धोरणे' या विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळा घेण्यात आली. काल साजऱ्या झालेल्या 'ट्रान्सजेंडर दृश्यमानता दिनाचं औचित्य साधून या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. कार्यशाळेत सहभागी मान्यवरांनी समाजातील सर्व तृतीयपंथीयांना सामाजिक प्रवाहात सामावून घ्यावं तसंच त्यांना समानतेची वागणूक द्यावी असं आवाहन केलं.

**मूकबधिर-ऑलिंपिक**

जपानमध्ये टोक्यो इथं सुरू असलेल्या मूकबधीरांच्या 25 व्या ऑलिंपिक स्पर्धांमध्ये भारतीय नेमबाजांनी आपली घोडदौड कालही सुरू ठेवली. अभिनव देशवाल आणि प्रांजली धुमाळ या जोडीनं 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. नेमबाजीत भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत 11 पदकं जिंकली आहेत.

**हवामान**

राज्यात थंडीचा कडाका वाढला असून अनेक ठिकाणी पारा 10 अंशांच्या खाली घसरला आहे. पुढचे काही दिवस असंच हवामान राहण्याचा आणि काही ठिकाणी थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार